# हैदराबाद मुक्ती संग्रामामध्ये हिप्परगे येथील राष्ट्रीय शाळेच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास

**लेफ्ट. डॉ. अर्चना टाक**
सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)

## १. प्रस्तावना (Introduction):-

माउंटबटन योजनेनुसार भारताची फाळणी झाली आणि भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ नंतर संस्थानिकांना स्वातंत्र्य बहाल करण्यात आले. जवळपास ५५० हून अधिक संख्या असलेल्या भारतातील संस्थानिकांच्या स्वातंत्र्यामुळे देशाच्या एकात्मतेला मोठे आव्हानच निर्माण झाले होते. भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी संभाव्य परिणामांचे गांभीर्य लक्षात घेऊन संस्थानांच्या विलीनीकरणासाठी तत्काळ पावले उचलण्यास सुरुवात केली. त्यानुसार सरदार पटेल यांनी एक मसुदा तयार करून त्याद्वारे संस्थानिकांना भारतीय संघराज्यात सामील होण्यास सांगितले. त्यानुसार अनेक संस्थानिक भारतीय संघराज्यात सामील झाले. काहींनी थोडी कुरबुर केली. त्यांच्याबाबत सरदार पटेलांनी कडक भूमिका घेतल्याने तेही सामील झाले. अशाप्रकारे जुनागड, हैदराबाद व काश्मीर ही तीन संस्थाने वगळता बाकीची सर्व संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन झाली. या तीन संस्थानांपैकी जुनागड व हैदराबाद ही संस्थाने सरदार पटेल यांनी लष्करी बळाचा वापर करून विलीन करून घेतली. काश्मीरचा प्रश्न मात्र अद्यापही सुटलेला नाही. यापैकी हैदराबाद संस्थानातील हिप्परगे याठिकाणी स्थापन झालेल्या राष्ट्रीय शाळेचे कार्य मुक्ती संग्रामाला एक नवे वळण देणारे कसे ठरले, याचा अभ्यास करण्यासाठी "हैदराबाद मुक्ती संग्रामामध्ये हिप्परगे येथील राष्ट्रीय शाळेच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास" या विषयाची प्रस्तुत संशोधन लेखासाठी निवड करण्यात आली आहे.

एक शिक्षक काय-काय करू शकतो? शिक्षकांच्या हातात देशाचे भविष्य असते. कारण शिक्षकांमुळे भविष्यातले डॉक्टर्स, शास्त्रज्ञ, इंजिनीअर, लेखक, शिक्षक आणि अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करून देशाचे नाव उंचावणारी सामर्थ्यवान पिढी शिक्षकच तयार करतात. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यामध्ये शिक्षकांचा वाटा मोठा असतो. विद्यार्थ्यांमध्ये जगासमोर उभे राहण्याची ताकद शिक्षकांमुळेच येते. शिक्षक एक सुसंस्कारीत पिढी निर्माण करू शकतो. क्रांतिकारक निर्माण करू शकतो. एक मजबूत समाज आणि राष्ट्र निर्माण करू शकतो. स्वातंत्र्य आंदोलनही घडवून आणू शकतो. हैदराबादचा मुक्ती लढा हे याचे उत्तम उदाहरण आहे. शिक्षकांनी नेतृत्व केलेला हैदराबाद मुक्तीचा लढा हा अभूतपूर्व होता.

या मुक्ती लढ्याची व्याप्ती खूप मोठी आहे. हैदराबादच्या शासकांची धर्मांधता व त्यांनी केलेले धार्मिक अत्याचार, त्याविरुद्ध संस्थानातील प्रजेची प्रतिक्रिया, असंख्य संघटना स्थापन झाल्या. त्यांनी निजाम राजवटीला विरोध केला. या संघटनांची असंख्य अधिवेशने झाली, बैठका झाल्या. ते सर्व ऐतिहासिक होते. असंख्य सत्याग्रह झाले. असंख्य क्रांतिकारी आंदोलने झाली. हजारोंनी आपल्या जीवाचे बलिदान दिले. हौतात्म्य पत्करले. ह्या सगळ्याचा पाया शिक्षणात आहे.

### निजाम राज्याची स्थापना:

हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम हा एक अतिशय निश्चयाने व निग्रहाने लढविला गेलेला स्वातंत्र्य संग्राम आहे. ज्या नेत्यांनी याची पायाभरणी केली, त्यांना इतिहास कधी विसरू शकणार नाही. कारण हैदराबाद हे मोठे वैशिष्ट्यपूर्ण राज्य आहे. भौगोलिकदृष्ट्या व ऐतिहासिक दृष्टीने त्याचे एक अजब स्थान राहिले आहे. भौगोलिकदृष्ट्या हिंदुस्थानच्या मध्यभागी हे स्थान होते आणि वेगवेगळ्या राजवटीशी लढत-लढत या राज्याने जवळ-जवळ २२४ वर्षे स्वत:चे अस्तित्व टिकविले. ते कधी मोगलांशी लढले, कधी मराठ्यांशी दोन हात केले त्यांनी. ब्रिटीशांची सत्ता आल्यावर त्यांच्याशी मिळते-जुळते घेऊन स्वत:चे स्थान कायम टिकविले.

जगण्यासाठी जो चिवटपणा असावा लागतो, तो या निजामाच्या राज्याने अतिशय तीव्रतेने दाखवून दिला, हे आपण काबुल केले पाहिजे. त्यामुळे अशा राजवटीशी स्वातंत्र्यासाठी लढणे हे सोपे कामं नव्हते. या राजवटीने जवळपास सव्वादोनशे वर्षे येथील जनतेचे आर्थिक, सामाजिक व धार्मिक सुद्धा अतिशय कठोर अशा प्रकारचे शोषण केले होते. या जनतेत जसे मराठी भाषिक होते तसेच तेलुगु व कन्नड भाषिकही होते. अशा भिन्न भाषिक लोकांमध्ये एकसंघ भावना निर्माण करणे ही मुलत: अवघड गोष्ट होती. परंतु हैदराबादच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या नेत्यांनी ही गोष्ट यशस्वीरित्या पार पाडली.

हैदराबादचा स्वातंत्र्य लढा हा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य संग्रामाचा जवळ-जवळ शेवटचा टप्पा होता. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामानंतर गोव्याची लढाई झाली. त्यामुळे हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम हा शेवटचा लढा म्हणता येणार नाही. हैदराबादची लढाई ही राजकीय दृष्ट्या अतिशय गुंतागुंतीची व महत्वाची होती.

इतिहासाचा हा उदात्त काळ होता. आज आपण आपल्या अवती भोवती पाहू लागलो की, हे सगळे भारतात घडले होते का? असे मनात येऊन जाते. हे उदात्त काम करणारी पिढी आपल्या देशात होऊन गेली याची पुन्हा आठवण येते व मन आदराने नम्र होते. इ.स. १९४७ मध्ये जेव्हा भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा शेवटचा काळ होता, तेव्हा हैदराबाद संस्थानात वेगवेगळ्या संघटना स्थापन करणे हे अवघड काम होते. पण कार्यकर्त्यांनी मनावर घेतल्यानंतर आणि जनतेचा पाठींबा असल्यानंतर काय होऊ शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे.

इ.स. १७०७ हे वर्ष भारताच्या इतिहासात महत्वाचे आहे वर्ष आहे. यावर्षी मोगल बादशहा औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्युनंतर दिल्लीच्या गादीवर येऊन गेलेले सर्व मोगल बादशहा दुबळे निघाले.या गोष्टीचा फायदा जसा मोगलांच्या शत्रूंना झाला, तसाच तो मोगलांच्या महत्वाकांक्षी व स्वार्थी सरदारानीही मोगलांच्या या दुर्बलतेचा फायदा घेतला. हैदराबादच्या स्वतंत्र राज्याचा संस्थापक चिनकिलीच खान ऊर्फ मीर कमरुद्दीन हा त्यापैकीच एक होता. त्याचे पणजोबा आलमशेख हे मुळचे समरकंद येथील होते. आजोबा ख्वाजा आबिद हे बुखाऱ्याहून भारतात आले व औरंगजेबाच्या सेवेत रुजू झाले. वडील मीर शहाबुद्दीन यांना गुजरातची सुभेदारी मिळाली होती. तर या मीर कमरुद्दीनला वेध लागले होते, ते दक्षिण भारतात स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचे.

इ.स. १७१३ हे एक वर्ष दक्षिण भारताच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचे वर्ष ठरले. यावर्षी मराठ्यांच्या राज्यात छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथ यांना पेशवेपद दिल आणि मोगल बादशहा फरुखसियरने चिनकिलीच खान ऊर्फ मीर कमरुद्दीन याला दक्षिणेची सुभेदारी दिली. दोघांचाही आपापसात संघर्ष होत राहिला. पेशव्यांनी ब्रिटीशाना विरोध केला. परिणामत: त्यांच्या सत्तेचा शेवट घडून आला. निजामानी मात्र ब्रिटीशांशी मिळते-जुळते घेतले. त्यामुळे त्यांची सत्ता दोन शतकांहून अधिक काळ टिकली. मीर कमरूद्दीन यास मोगल बादशहा महम्मदशहा याने आसिफजाह हा किताब दिला होता. त्यामुळे त्याच्या घराण्यास आसिफजाह अथवा आसिफिया अथवा आसिफशाही घराणे हे नाव मिळाले. इ.स. १७२४ ते १९४८ याकाळात पुढील सात निजामांनी या प्रदेशावर राज्य केले.

| अ. क्र. | निजाम | कालखंड |
|---|---|---|
| १ | मीर कमरुद्दीन | इ.स. १७२४ ते १७४८ |
| २ | मीर निजाम अली | इ.स. १७६२ ते १८०३ |
| ३ | सिकंदरशहा | इ.स. १८०३ ते १८२९ |
| ४ | नसीर उद्दौला | इ.स. १८२९ ते १८५७ |
| ५ | अफजल-उल -दौला | इ.स. १८५७ ते १८६१ |
| ६ | मीर महबूब अली | इ.स. १८६१ ते १९११ |
| ७ | मीर उस्मान अली | इ.स. १९११ ते १९४७ |

**निजामकालीन मराठवाडा:**

**राजकीय स्थिती:**

हैदराबाद संस्थानात एकूण सात निजाम होऊन गेले. निजाम आणि मराठे यांच्यात सत्ताविस्तारासाठी अनेकदा मराठवाड्यात संघर्ष घडून आले. त्यांच्यात झालेल्या पालखेड, सिंदखेड, उदगीर, राक्षसभुवन आणि खर्डा येथील लढायांत मराठ्यांनी निजामाचा पराभव केला होता. या प्रत्येक लढाईनंतर मराठ्यांनी निजामावर तह लादले. परंतु मराठ्यांना त्यांच्यातील अंतर्गत दुहीमुळे निजामाचे राज्य नष्ट करता आले नाही. हैदराबाद संस्थानातील प्रत्येक राज्यकर्त्याने हुकुमशाही प्रवृत्तीनेच राज्यकारभार केला. त्यांना जनतेबद्दल अजिबात प्रेम नव्हते. लोककल्याणाची त्यांना चिंता नव्हती. संस्थानातील ११६७ जहागिरदारांनी निजामाला विरोध

करण्याऐवजी पाठींबा दिलेला होता. कारण निजामाची सत्ता गेल्यास यांच्याही जहागिऱ्या गेल्या असत्या. गादीवर येऊन गेलेले सगळेच निजाम हुकुमशाही प्रवृत्तीचे असल्याने त्यांनी आपल्या प्रजेला राजकीय हक्क , अधिकार व स्वातंत्र्य कधीच दिले नाही. जनतेच्या मनामध्ये राजकीय अधिकारांची जाणीव निर्माण होणार नाही याची दक्षता सर्वच निजमनी घेतलेली होती.

राजकीय जागृती होण्यामध्ये राष्ट्रीय शिक्षण हा घटक अतिशय महत्वाचा असतो. निजामाच्या राजकीय दडपणाखाली असलेला समाज जागृत होण्यासाठी विसावे शतक उजाडावे लागले. कारण हैदराबाद संस्थानात राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापना विसाव्या शतकातच झाली. हि बाब इथे अधोरेखित करण्यासारखी आहे. राष्ट्रीय शिक्षण संस्थांमुळे राजकीय जागृती घडून आली. संस्थानातील समाज संघटीत झाला आणि आपल्या अधिकारांसाठी निजाम शासनाच्या विरोधात पेटून उठला. त्यामुळेच हैदराबाद मुक्ती संग्रामाची पायाभरणी झाली आणि हा संस्थान निजामाच्या राजकीय गुलामगिरीतून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात विलीन होऊ शकले.

**धार्मिक स्थिती:**

हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन व पारशी धर्मांचे लोक हैदराबाद संस्थानात रहात होते. यात ख्रिश्चन धर्मीयांची संख्या इतरांच्या तुलनेत फारच कमी होती. पारशी मुख्यत: शहरांत रहात. हिंदू व इस्लाम धर्मीय लोक खेड्यांत व शहरांत रहात होते. निजामाच्या राज्यात राहणाऱ्या विविध धर्मीय लोकांमध्ये हिंदू धर्मीयांची संख्या सर्वांत जास्त होती. जवळ-जवळ ८०% जनता हिंदू धर्मीय होती. परंतु धार्मिक व राजकीय क्षेत्रांत ते पिछाडीवर होते. या क्षेत्रांत इस्लाम धर्मियांचे वर्चस्व होते. इस्लामी संस्थानांना निजाम सरकारकडून उदारपणे अनुदान देण्यात येत असे. निजाम राजवटीने बिगर इस्लामी संस्थानांना देण्यात येणारी अनुदाने बंद केली. बिगर इस्लाम धर्मीय व्यक्तींना प्रार्थनास्थळ किंवा धार्मिक कार्यालय स्थापन करायचे झाल्यास निजाम सरकारची पूर्वपरवानगी घ्यावी लागे.

**शैक्षणिक स्थिती:**

अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना ही भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील एक महत्वाची घटना होती. हा भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाचा परिणाम होता. परंतु हैदराबाद संस्थानावर याचा काहीच परिणाम झाला नाही. याचे कारण येथील जनता अशिक्षित होती. शिक्षणाचा अभाव असलेल्या जनतेत कोणत्याही प्रकारच्या चेतना जागृत होऊ शकत नाहीत.

हैदराबादचे निजाम मुळचे समरकंद (सध्याच्या उझबेकीस्तान या देशातील) येथील रहिवासी होते. निजामाचे पूर्वज हिंदुस्तानात येऊन मोगलांचे चाकर बनले. शिवाय निजामाच्या राज्याची स्थापना होण्यापूर्वीपर्यंत हा भाग मोगल साम्राज्यात मोडत होता. मोगलांची राजभाषा फारशी असल्याने पहिल्या पाच निजामांच्या काळात फारशी हीच राजभाषा होती. नंतर सहावा निजाम महेबूब अली याने उर्दूला राजभाषा बनविले. त्यामुळे हैदराबाद राज्यात शिक्षणाचे माध्यम उर्दू भाषा बनली. असे असले तरी निजामाच्या राज्यातील जनता ही मराठी, तेलगु व कानडी भाषिक होती. त्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण मिळत नव्हते. इयत्ता पाचवीपासून सर्व विषय हे उर्दू भाषेतून शिकविले जात असत. ज्या विद्यार्थ्यांची उर्दू भाषेत प्रगती होत नसायची, अशा विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करून त्याच वर्गात बसविले जाई. अखलाकियत म्हणजे नीतिशास्त्र हा विषय देखील सक्तीचा असे. इतर सर्व विषयांत उत्तीर्ण होऊन जर विद्यार्थी या विषयात अनुत्तीर्ण झाला तर त्याला उनित्तीर्ण घोषित करण्यात येत असे. अशा विद्यार्थास पुन्हा सर्व विषयांची परीक्षा द्यावी लागत असे.

निजाम मीर उस्मान आली याच्याकडून इ.स. १९२३ मध्ये एक शैक्षणिक धोरणासंदर्भात एक आदेश काढला गेला. "यह मु सुल्लाप्रसिद्ध ही कि इस रियासत का मजहब सुन्नी अलहनकी फी, सरकारी मदारिसोमें हसबे अमलदशमद सिर्फ हनफे फिर्के की तालीम डी जाती रहे." (मराठवाडा स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव विशेषांक, दि. १७ सप्टेंबर १९९८ लेखक प्रा. भगवंत देशमुख, पृ. १८४) मराठी, कन्नड तसेच तेलुगु भाषिक आई वडील अशासाठी सुद्धा आपल्या मुलास प्राथमिक शाळात पाठवत नसत. कारण एक तर सोयी अपुऱ्या असत. आणि उर्दू माध्यमात शिक्षण दिले जात असल्याने मुलास शिकवू इच्छित नसत. तेव्हा हिंदु मुस्लीम मुलांचे प्रमाण पाहण्यासारखे आहे. इ.स.स १९११ मध्ये प्राथमिक शाळेत जाणाऱ्या हिंदू विद्यार्थ्यांची संख्या ३.१ टक्के, मुस्लिम विद्यार्थ्यांची संख्या १२.५ टक्के, इ.स. १९२१ मध्ये हिंदू १० टक्के, मुस्लिम ४६.० टक्के, इ.स. १९२७ मध्ये हिंदू मुलांची संख्या १२.२ टक्के, मुस्लीम मुलांची संख्या ५४.६ टक्के, इ.स. १९४१ मध्ये हिंदू मुलांची संख्या १७.१ टक्के

आणि मुस्लीम मुलांची संख्या ७७.१ टक्के होती. ही संख्या राज्यास पूर्णपणे इस्लाममे बनविण्याची योजना आखली गेली असल्याचे दर्शविते. (लोखंडे, पृ.८०)

याचाच अर्थ हा की, त्याकाळात धार्मिक शिक्षणावर भर दिला जात होता. इस्लाम धर्माचा प्रचार-प्रसार करणे हाच शिक्षण देण्यामागे निजाम राज्यकर्त्यांचा उद्देश होता. उर्दू, अरबी, फारशी भाषांचे व इस्लाम धर्माचे शिक्षण देण्याचा अट्टाहास होत असे. परंतु त्याला विरोध करण्यासाठी एज्युकेशनल कॉन्फरन्स या संस्थेने पुढाकार घेतला होता. या संस्थेची काही अधिवेशने झाली. त्यापैकी इ.स. १९१६ मध्ये औरंगाबाद, इ.स. १९१६ व इ.स. १९१८ यावर्षी हैदराबाद, इ.स. १९१९ मध्ये लातूर व इ.स. १९२० मध्ये परभणी याठिकाणी ही अधिवेशने भरली होती. इ.स. १९२० च्या परभणी येथील शिक्षण परिषदेत शाळांच्या स्थापने विषयी अनेक प्रस्ताव संमत केले गेले.याचाच परीनाव व श्री. व्यंकटराव माधवराव देशमुख, श्री. अनंतराव गीविन्द्रव कुलकर्णी यांनी हिप्परगा येथे केलेली राष्ट्रीय शाळेची स्थापना होय.

**हैदराबाद शिक्षण परिषदेचे कार्य:**

या परिषदेच्या व्यासपीठावरून उर्दू भाषेच्या सक्तीला विरोध होऊ लागला होता. संस्थानातील प्रजेला माध्यमिक शिक्षण मातृभाषेतून देण्यात यावे, अशी मागणी करण्यात येऊ लागली होती. यासाठीच केशवराव कोरटकर यांच्या अध्यक्षतेखाली जनता शिक्षण परिषदेचीही स्थापना करण्यात आली होती.

एकंदरीत शिक्षण क्षेत्रामध्ये निजाम सरकारने बंधने लादली होती,खाजगी शाळा, ग्रंथालय वगैरे काढणे अशक्य झाले होते. निजामाच्या राज्यात स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले नव्हते. फक्त श्रीमंतांच्या मुळीच शिकत. निजाम राजवटीत मध्ययुगीन धार्मिक परंपरेनुसार स्त्रियांनी केवळ कुटुंब सांभाळावे व धर्माचे पठण करावे अशी प्रथा होती.

**उस्मानिया विद्यापीठ:**

इ.स. १९१८ मध्ये उस्मानिया विद्यापीठ स्थापन झाले. या विद्यापीठात देखील इस्लामी धर्मशिक्षणावर भर देण्यात आला. या विद्यापीठात बिगर इस्लामी विद्यार्थ्यांना मर्यादित संख्येत प्रवेश देण्यात येत असे. या विद्यापीठातून अपेक्षेप्रमाणे अल्पावधीतच कडव्या धर्मनिष्ठ मुस्लीम सुशिक्षितांची एक पिढीच उदयाला आणली. इतरांपेक्षा आपण श्रेष्ठ, आपला धर्म श्रेष्ठ, आपले राज्य श्रेष्ठ, आपले राज्यकर्ते व आपली भाषा श्रेष्ठ अशा प्रकारच्या अहंकाराने या पिढीला पछाडले आणि ते स्वत:ला इतरांपेक्षा वेगळे समजू लागले. हे सर्व या विद्यापीठातील त्याकाळातील शिक्षणामुळे झाले.

वास्तविक पाहता उस्मानिया विद्यापीठाच्या रुपात निजाम राज्यात उच्च शिक्षण संस्थेची स्थापना झाली होती. त्यामुळे संस्थांनी प्रजेमध्ये आनंदाचे, उत्साहाचे, समाधानाचे वातावरण निर्माण व्हायला हवे होते. परंतु तसे झाले नाही. बिगर इस्लाम धर्मीय विद्यार्थ्यांचा भ्रमनिरास झाला. त्यांच्या मनात या विद्यापीठाबद्दल कधीच आपुलकी निर्माण झाली नाही. त्यांना हे विद्यापीठ कधीच आपले वाटले नाही. या विद्यापीठातून देण्यात येणाऱ्या कडव्या धर्मनिष्ठ शिक्षणामुळे या बिगर इस्लामी विद्यार्थ्यांचा स्वाभिमान दुखावला गेला. एकंदरीत निजामाच्या राज्याने आपल्या प्रजेला कधीही समान नागरिकत्व प्रदान केले नाही. सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या निजामाच्या राज्यात आपल्याला दुय्यम स्थान असल्याची भावना विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाली.

खरे तर शिक्षणाच्या प्रसारामुळे सामाजिक गटांतील अंतर कमी व्हायला हवे. परंतु उस्मानिया विद्यापीठाच्या स्थापनेमुळे तसे न होता हिंदू-मुस्लीम या दोन गटांतील अंतर वाढत गेले. कारण या विद्यापीठातून होणारा शिक्षणाचा प्रसार हा केवळ एका विशिष्ट वर्गासाठीच होत होता. एकंदरीत शिक्षण क्षेत्रामध्ये निजाम सरकारने बंधने लादली होती, खाजगी शाळा, ग्रंथालय वगैरे काढणे अशक्य झाले होते. निजामाच्या राज्यात स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले नव्हते. फक्त श्रीमंतांच्या मुळीच शिकत. निजाम राजवटीत मध्ययुगीन धार्मिक परंपरेनुसार स्त्रियांनी केवळ कुटुंब सांभाळावे व धर्माचे पठण करावे अशी प्रथा होती.

इ.स. १९२० पासून भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व महात्मा गांधीजींकडे आले. जनआंदोलने हे त्यांच्या काळाचे वैशिष्ट्य ठरले. इथून पुढे सर्वसामान्य जनता स्वातंत्र्य लढ्यात मोठ्या प्रमाणात सक्रीय सहभागी होऊ लागली. गांधीजींच्या या चळवळीचा परिणाम हैदराबाद संस्थानातील प्रजेवरही होऊ लागला होता. या भागात सामाजिक परिषदा, शिक्षण परिषदा, राजकीय परिषदा भरत होत्या. विद्यार्थ्यांनी सरकारी शाळांवर बहिष्कार टाकून राष्ट्रीय शिक्षण संस्था स्थापन करण्याची प्रेरणा महात्मा गांधीनी दिली होती. त्यांच्या विचारांची स्फूर्ती घेऊन श्री. व्यंकटराव देशमुख आणि श्री. अनंतराव कुलकर्णी यांनी इ.स. १९२१ यावर्षी हिप्परगा येथे राष्ट्रीय शाळेची स्थापना केली.

**हैदराबाद संस्थानात राष्ट्रीय शिक्षणास प्रारंभ:**

इ.स. १९०७ यावर्षी हैदराबाद येथे विवेक वर्धिनी व इ.स. १९०८ यावर्षी गुलबर्गा येथे स्थापन झालेले नूतन विद्यालय, यांच्या रुपात हैदराबाद संस्थानातील राष्ट्रीय शिक्षण संस्थेच्या चळवळीस सुरुवात झालेली होती. परंतु या शिक्षण संस्थांमुळे मराठवाड्यात राष्ट्रीय शिक्षणाचा फारसा प्रसार होऊ शकला नव्हता.

**हिप्परगे येथे राष्ट्रीय शाळेची स्थापना:**

हिप्परगा हे गाव उस्मानाबाद जिल्ह्यातील असून सध्या त्या गावाचा तालुका लोहारा आहे. लोहारा तालुक्याच्या निर्मितीच्या पूर्वी ते गाव तुळजापूर तालुक्यात होते. हे हिप्परगा गाव व्यंकटरावांचे मूळ गाव होते. त्यांचे वडील माधवराव हे रसिक मनाचे विद्वान व्यक्ती होते. व्यंकटराव मिडलच्या फायनलला म्हणजेच सातव्या इयत्तेत शिकत असतानाच त्यांच्या वडिलांचे, माधवरावांचे निधन झाले. माधवरावाना तीन मुले होती. थोरले व्यंकटराव, मधले अनंतराव आणि धाकटे गोपाळराव. यापैकी व्यंकटराव तीन भावंडात मोठे असल्याने घराची संपूर्ण जबाबदारी व्यंकटरावांवर आली. त्यांनी आपले मिडलचे शिक्षण पूर्ण करून सहा महिन्यांचा वकिलीचा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला व ते लोहारा येथे वकिली करू लागले. वकिली करणे ही त्यांची पहिली आवड नव्हती. परंतु कुटुंबाची जबाबदारी अंगावर आल्याने त्यांना ते करावे लागत होते. त्यांना शिक्षणाविषयी प्रचंड तळमळ वाटत होती. लोहारा येथे वकिली करत असताना व्यंकटराव त्यांच्या हिप्परगा या मूळ गावी श्री. रघुनाथ विद्याधर भावे मास्तरांच्या मदतीने मुलांना गोळा करून शिकवत असत. कुटुंबाची गरज म्हणून त्यांना वकिली करावी लागत असली तरी शिक्षकी पेशा हीच त्यांची मूळ आवड होती. श्री. भावे हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सहकारी होते. क्रांतिकारक असल्याने त्यांचे जवळचे नातलगदेखील त्यांना आसरा देण्यास तयार नव्हते. अशा परिस्थितीत व्यंकटरावांनी त्यांना लोहारा येथे आणले होते.

इ.स. १९२० यावर्षी लोकमान्य टिळकांचे निधन झाले. त्यांच्या विचारांनी झपाटलेल्या आणि देशप्रेमाने भारावलेल्या व्यंकटरावांच्या मनात राष्ट्रीय शाळेची स्थापना करण्याचे विचार घोळू लागले. राष्ट्रीय शाळेत मुलांना मातृभाषेत शिक्षण द्यायचे, निदान मातृभाषा अधिक चांगल्या पद्धतीने शिकवायची, त्यांच्यावर देशभक्तीचे, आपल्या संस्कृतीचे व परंपरांचे संस्कार करावयाचे, असे त्यांनी ठरविले. अशातच लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधीजींकडे भारतीय राष्ट्रीय सभेचे नेतृत्व गेले होते आणि त्यांनी असहकाराच्या चळवळीस प्रारंभ केला होता. सरकारी शिक्षण संस्थांवर बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापना हा असहकार चळवळीचा एक मुख्य भाग होता. व्यंकटरावांचे बंधू अनंतराव हे यावेळी पुण्यातील महाविद्यालयात बी. ए. च्या शेवटच्या वर्गात शिक्षण घेत होते. त्यांच्यावर गांधीवादी चळवळीचा खूप मोठा प्रभाव पडलेला होता आणि म्हणूनच त्यांनी आपले संपत आलेले महाविद्यालयीन शिक्षण सोडून देऊन ते व्यंकटरावांकडे आले.

आता पुढे काय करायचे? हा प्रश्न अनंतरावांसमोर होता. नेमके याच वेळेस व्यंकटरावांच्या मनात शाळा काढण्याचे विचार घोळत होते. दरम्यानच्या काळात अनंतरावांना सरकारी शाळेत शिक्षकाची नोकरी मिळाली होती आणि त्यात त्यांना बढती मिळण्याचीही शक्यता निर्माण झाली होती. असे असतानाही त्यांनी ती नोकरी सोडून देऊन आपल्या मूळ गावी आले. त्यांनी व व्यंकटरावांनी मध्यंतरी हिप्परग्यास जाऊन आपला शाळा काढण्याचा मनोदय तेथील लोकांना कळवला होता. चर्चेअंती ही शाळा काढावी; पहिल्या वर्षी तिसरीपर्यंतचे वर्ग काढावे व हळूहळू वर्षाला एक याप्रमाणे नवीन वर्ग उघडावे असे ठरले. गावकरी लोकांनी पन्नास रुपये दरमहा याप्रमाणे ५ वर्षे मदत करावी. ह्या मदतीपोटी म्हणून ६०० रुपये द्यावे व दर वर्षी आगाऊ ६०० रु. द्यावे असे ठरले. गावकऱ्यांच्या मुलांची शाळेची फी घेऊ नये अशीही अट त्यात अंतर्भूत होती. गावकऱ्यांनी हे त्यांचे वचन कमी अधिक रीतीने पाळले ही उल्लेखनीय गोष्ट आहे. गावकऱ्यांचे हे आश्वासन मिळताच अनंतरावांनी नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला व इ.स. १९२१ मध्ये संस्था स्थापन करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु केल्या. गावात घरोघर जाऊन मुलांना शाळेत पाठविण्याची प्रेरणा दिली. संस्थेकरिता जागेचा प्रश्न होता. तो प्रश्न तेथीलच एक छोटे शेतकरी व सावकार श्री होनाळकर रामप्पा व होनाळकर महादबा ह्या बंधूनी सोडवला. त्यांनी आपली नवी राहण्याकरिता बांधलेली सुमारे ३०-४० खणांची इमारत विनामुल्य शाळेस वापरण्यास दिली. त्याप्रमाणे शाळा चालू असेतोपर्यंत व त्या दोघांच्या पश्चात विश्वनाथराव शिवप्पा, पंढरीनाथ, नरसिंगा इ. होनाळकर मंडळीनी तो वाडा शाळेस वापरण्यास दिला. एवढेच नव्हे तर त्यांच्या स्वत:च्या मालकीची बांधलेली विहीर चार फर्लांगावर होती, त्या विहिरीचा उपयोगही शाळा चालू

असेतोपर्यंत विनामुल्य करू दिला. शाळेवर व शाळेच्या कार्यावर ह्या मंडळींचे नितांत प्रेम होते. प्रसंगी वाटेल ती झळ सोसावयास ते मागेपुढे पहात नसत. विहिरीवरील मुलांच्या वर्दळीमुळे त्यांचे अनेक प्रकारे नुकसान झाले पण त्याबद्दल त्यांनी कधी अवाक्षरही काढले नाही. मधून मधून आर्थिक मदतही करीत व शाळेला उसनवार रकमा देत. एकूण शाळेच्या कार्यात त्यांचा सहभाग ही अत्यंत महत्वाची गोष्ट होती. शाळेवरील प्रेमाच्या बाबतीत त्यांनी सुमारे २५ वर्षे अत्यंत आपुलकीने व सहर्ष सहकार्य दिले.

वरीलप्रमाणे तयारी करून १९२१ च्या नवमी दिवशी अनंतराव हिप्परगा येथे गेले व विजयादशमीस उठून अनंतरावांनी लोकमान्य टिळकांचे स्मरण केले व त्यांच्याच प्रमाणे शाळेची जागा शेणाने स्वत:च्या हाताने सारवली. सरस्वतीचा एक फोटो लावला व गावातल्या सर्व लोकांना निमंत्रित करून शाळा स्थापन केल्याची घोषणा केली. त्यादिवशी फक्त १४ विद्यार्थ्यांनी आपली नावे नोंदवली. दररोज सकाळी सरस्वतीच्या फोटोस वंदन करून सर्व विद्यार्थी व शिक्षक आपल्या अध्ययन व अध्यापनाच्या कार्यास प्रारंभ करत. हिप्परग्याच्या माळरानावर सुरु झालेल्या या शाळेत गोणपाटावर बसून शिक्षक विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेमाचे धडे देऊ लागले. व्यंकटरावांचे सुपुत्र भगवानराव हे त्यावेळी उस्मानाबादच्या दत्त दरबार या शाळेतून चौथीची परीक्षा दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. आता ते मिडलला प्रवेश घेण्यास पात्र असतानाही श्री. व्यंकटरावांनी व श्री. अनंतरावांनी त्यांना हिप्परग्यास आणून पुन्हा तिसरीच्या वर्गात बसविले. काही जवळच्या मंडळीनी व नातेवाईकानी ह्यास विरोध केला. तेव्हा व्यंकटराव म्हणाले, “आम्ही आमच्या मुलास शिक्षणाकरिता पुण्यास पाठवले, तर इतर लोकांस तुम्ही आपली मुले आमच्या शाळेत पाठवा असे कसे म्हणता येईल.” शाळेसाठी विद्यार्थी जमविण्याची त्यांची तळमळ यातून दिसून येते.

व्यंकटराव व अनंतराव या दोघा बंधूनी गोविंदराव दिवाण व कृष्णाजी शंकर केसकर या दोघांची शिक्षकपदी नेमणूक करून स्वत: शाळेचे सेक्रेटरी म्हणून काम पाहिले. व्यंकटराव हे कोर्टाला सुट्टी असेल त्याच्या आदल्या दिवशीच हिप्परग्यास येत असत. शाळेची पाहणी करत असत. विद्यार्थ्यांचा अभ्यास, त्यांचे खेळ, शाळेचे संपूर्ण कामकाज यावर त्यांची देखरेख असे. विद्यार्थी व शिक्षकांना आवश्यक त्या सूचना ते देत असत. पुढल्या दिवशी सकाळीच निघून पायी सहा मैल चालून जाऊन कोर्टात हजर होत असत.

हिप्परग्याच्या ग्रामस्थांनी मान्य केल्याप्रमाणे ते दर महिन्याला पन्नास रुपये शाळेस देत होते. परंतु त्यातून शाळेचा खर्च भागत नव्हता. म्हणून व्यंकटराव त्यांना कोर्टाच्या कामातून मिळणाऱ्या उत्पनातील घरखर्चाकरिता आवश्यक तेवढा भाग ठेवून घेऊन आपले उरलेले सर्वच्या सर्व उत्पन्न शाळेसाठी खर्च करीत होते. शाळेचा खर्च भागविण्याकरिता व्यंकटराव व अनंतराव या बंधूनी स्वत:च्या नावे कर्जेदेखील काढली. याच काळात शाळा बंद करावी असा सरकारी आदेश आला. परंतु मोठा खटाटोप करून व्यंकटरावांनी शाळेचे कार्य किती योग्य आहे, हे सरकारी अधिकाऱ्यांस दाखवून दिले. दिवसेंदिवस शाळेची विद्यार्थी संख्या वाढत चालली होती, वर्ग वाढत होते. त्यामुळे शाळेचा खर्चही वाढत चालला होता. व्यंकटराव स्वत:चे वैयक्तिक उत्पन्न शाळेसाठी खर्च करत होते. तरीदेखील खर्च भागत नव्हता. इ.स. १९२६ यावर्षी व्यंकटरावांनी आपली सर्व संपत्ती शाळेस दान केली. त्यांचे सुपुत्र भगवानराव, पत्नी पद्माबाई व ते स्वत: अशा तिघांच्या अंगावरील वस्त्रांसहित त्यांनी देशासाठी फकिरी पत्करली.

इ.स. १९२१ यावर्षी हिप्परग्याच्या उजाड माळरानावर श्री. व्यंकटराव देशमुख व श्री. अनंतराव कुलकर्णी या दोघा बंधूनी या राष्ट्रीय शाळेची स्थापना केली होती. ते लोकमान्य टिळकांचे अनुयायी होते. टिळकांनी संपूर्ण देशात असंतोषाचा अग्नी पेटविला होता. त्यांचाच आदर्श डोळ्यांसमोर ठेवून व्यंकटराव व अनंतरावांनी ही शाळा स्थापन केली होती. इ.स. १९२० मध्ये टिळकांचे निधन झाले व इ.स. १९२१ मध्ये हिप्परग्याला राष्ट्रीय शाळेचा जन्म झाला. निजामाच्या राजवटीत सरकारची परवानगी न घेता अशा प्रकारची राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा सुरु करणे, ही सामान्य गोष्ट नव्हती. कारण त्या काळात असा प्रयत्न करणे म्हणजे घरादारावर तुळशीपत्र ठेवण्यासारखेच होते. परंतु हे धाडस या दोघा भावांनी केले. व्यंकटराव, अनंतराव व गोपाळराव या तिघा भावांनी आपली सर्व संपत्ती शाळेला दान केली. राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या या शाळेमुळे परदास्याच्या अंधकारात हिप्परग्याच्या माळरानावर एक तेजस्वी प्रकाशझोत येत होता. या प्रकाशानेच भावी पिढ्यांच्या जीवनातील अंधार दूर केला. जनतेला स्वाभिमानाने जगण्याचा संदेश दिला.

निजामाच्या राजवटीत नि:सत्व जीवन जगण्यापेक्षा स्वातंत्र्य देवतेसाठी बलिदान देणारी पिढी तयार झाली. योगायोगाने या शाळेत स्वामी रामानंद तीर्थ हे मुख्याध्यापक म्हणून रुजू झाले. नियुक्तीच्या वेळी ते टिळक विद्यापीठातून पदवीधर झालेले होते. असामान्य बुद्धिमत्ता जवळ असलेले श्री. बाबासाहेब परांजपे हे वीस वर्षांचे तरुण या शाळेत विज्ञानाचे शिक्षक म्हणून रुजू झाले होते. वास्तविक पाहता बाबासाहेबांना पुढील शिक्षणासाठी जर्मनीस जाण्याची संधी आली होती. ती नाकारून देशप्रेमाने भारावलेल्या श्री. बाबासाहेब परांजपे यांनी हिप्परग्याच्या शाळेत तरुण पिढीला घडविण्याचे काम हाती घेतले. स्वामी रामानंद तीर्थ यांनी त्यांच्या आत्मचरित्रात लिहिले आहे की, "ईश्वरी योजना ही अगम्य असते. एखाद्या दिवशी मी वर्गात काही मुलांना घेऊन काही शिकवत बसेन याची मला स्वप्नात सुद्धा कल्पना नव्हती. पण १९२९ च्या जून महिन्यात ग्रामीण भारताच्या एका कानाकोपऱ्यात चाललेल्या एका राष्ट्रीय शिक्षण संस्थेचा प्रमुख म्हणून प्रत्यक्षात काम करू लागलो हे सत्य होते."

स्वामी रामानंद तीर्थ यांना दर महिन्याला ५० रुपये पगार मिळत होता. परंतु त्यांनी कधीही या पगाराचा पैसा घेतला नाही. ते मुख्याध्यापक असूनही दररोज गावात चार घरी भिक्षा मागून नरसोबाच्या मंदिरात बसून ते अन्न खात असत. जेवणाआधी जर कोणी उपाशी व्यक्ती मंदिरात दिसला तर आपल्या भिक्षेतील अर्धा भाग त्याला देत असत आणि उरलेले अन्न स्वत: प्रसन्न चित्ताने खात असत कारण त्यांच्या ठिकाणी लोकमान्य टिळकांचा खंबीरपणा, महात्मा गांधीजींची अहिंसा आणि साने गुरुजींची मुले म्हणजे उमलणारी फुले ही वृत्ती होती. मातृहृदय हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग होता. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या वि. स. खांडेकर यांनी हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेवर किर्लोस्कर मासिकात त्यावेळी लेख लिहून माळरानावरील फुलबाग या अर्थाने या शाळेचा गौरव केला. हिप्परग्याच्या या राष्ट्रीय शाळेतूनच स्वामी रामानंद तीर्थ, देवीसिंग चौहान, बाबासाहेब परांजपे, विश्वनाथराव हराळकर, राघवेंद्रजी दिवाण, यासारख्यांनी हैदराबादच्या स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले. स्वातंत्र्याच्या धैय्यवादाने प्रभावित झालेली नवी पिढी उदयास आली. अनेकांनी स्वत:ला या लढ्यात समर्थपणे झोकून दिले. ही सर्व किमया केवळ हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेमुळेच घडून आली.

हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेनंतर स्वामी रामानंद तीर्थ यांनी इ.स. १९३५ यावर्षी अंबाजोगाई येथे योगेश्वरी शिक्षण संस्थेची स्थापना करून योगेश्वरी विद्यालय सुरु केले. वास्तविक पाहता मराठवाड्यातील शिक्षण संस्थेच्या चळवळीचा आरंभ हा अनुक्रमे हैदराबादच्या इ.स. १९०७ मध्ये व गुलबर्ग्याच्या इ.स. १९०८ मध्ये स्थापन झालेल्या विवेक वर्धिनी व नूतन विद्यालयापासून सुरु झाला. तरीही त्यामुळे संपूर्ण मराठवाड्यात मात्र राष्ट्रीय शिक्षणाचा फारसा प्रसार होऊ शकला नाही. इ.स. १९२०-२१ नंतर मराठवाड्याच्या विविध भागात विविध वाचनालये, व्यायामशाळा, आखाडे अस्तित्वात आले. त्यामुळे शिक्षण संस्थांच्या निर्मितीला अनुकूल वातावरण निर्माण झाले व मराठवाड्यात शिक्षणाचा प्रसार होऊ शकला. निजाम सत्तेच्या अत्याचाराविरुद्ध लोकमत जागृत झाले ते केवळ या शिक्षण संस्थांमुळेच. त्यातूनच नवी नेतृत्वे उदयास आली. महाराष्ट्र परिषद, स्टेट कॉंग्रेस,वंदे मातरम, जंगल सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह अशा विविध आंदोलनांना गती देण्यात व दिशा दाखविण्यात हिप्परग्याच्या या राष्ट्रीय शाळेचे योगदान मोठे आहे. निजाम राजवटीत उर्दू भाषेतून शिक्षणाची सक्ती असताना या शाळेने मातृभाषेतून शिक्षण द्यायला सुरुवात केली. मातृभाषेतून शिक्षण मिळू लागल्यामुळेच बहुजन समाजात क्रांती घडून आली. बहुजन समाजही हैदराबाद मुक्ती लढ्यात सहभागी झाला आणि या मुक्ती लढ्याला जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले.

**संदर्भ सूची:**


१. प्रा. भगवंत देशमुख, मराठवाडा स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव विशेषांक, दि. १७ सप्टेंबर १९९८.
२. बाबुराव पिराजी माळी, राष्ट्रीय शाळा हिप्परगे शिल्पकारांची स्मरणगाथा.
३. संपा. भ. व्यं. देशमुख, हैदराबाद मुक्ती संग्रामाचे आद्यपीठ राष्ट्रीय शाळा - हिप्परगे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, एप्रिल २००४.
४. संपा. वि.पां. देऊळगावकर, स्वामी रामानंद तीर्थ यांची दैनंदिनी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, ऑगस्ट २००१.
५. भाऊसाहेब शिवाजीराव उमाटे, शौर्यगाथा हैदराबाद मुक्ती संग्रामाची, वेदश्री प्रकाशन, लातूर, सप्टेंबर २०२२.

VOL- XII ISSUE- XII DECEMBER 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

६. संपा. प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, पूज्य बाबासाहेब परांजपे स्मृतिग्रंथ, बाबासाहेब परांजपे फाउंडेशन, लातूर, मार्च २०१९.
७. डॉ. अनिल कठारे, मराठवाद्याचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, जुलै २०१३.
८. डॉ. चंद्रशेखर लोखंडे, मराठवाद्याचा मुक्ती लढा आणि हैदराबाद संस्थान, विद्याभारती प्रकाशन, लातूर.
९. चारठाणकर विनायकराव, स्वातंत्र्य संग्राम-परभणी जिल्ह्याचे योगदान, परभणी जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती, परभणी, १९९६.
१०. डॉ. रोडे सोमनाथ शंकर, संन्यस्त स्वातंत्र्य सेनानी पू. रामानंद तीर्थ, निर्मल प्रकाशन, औरंगाबाद, १९९९.
११. डॉ. रोडे, सोमनाथ शंकर, मराठवाड्याचा इतिहास', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९९.
१२. चपळगावकर, नरेंद्र, कर्मयोगी संन्यासी, मौज प्रकाशनगृह, मुंबई १९९९.